# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/ए-२/ १२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 109
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक: १०/०१/२०२५.

प्रति,

प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

<u>विषय</u>:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इ.१२ वी फेब्रु /मार्च-२०२५ लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रकाबाबत....

संदर्भ: - राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/४५०५, दिनांक २१.११.२०२४ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, फेब्रु /मार्च-२०२५ मध्ये होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| **०१** | **लेखी परीक्षा** | **मंगळवार दिनांक ११ फेब्रुवारी,२०२५ ते मंगळवार दिनांक १८ मार्च, २०२५** |
| **०२** | **प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा** | **शुक्रवार दिनांक २४ जानेवारी ,२०२५ ते सोमवार दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांची प्रात्यक्षिक परीक्षेसह)** |
| **०३** | **आऊट ऑफ टर्न (प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा)** | **दिनांक १२, १५ व १७ मार्च २०२५** |

**परीक्षेसंदर्भात महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे-**

१. इ. १२ वी ची प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार checker/maker याचा अवलंब करून online पध्दतीने मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या संकेतस्थळावर www.mahahsscboard.in यावर उपरोक्त दिलेल्या दिनांकानुसार संबंधीत कनिष्ठ महाविद्यालयामार्फत घेण्यात यावी.

२. प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे गुण PORTAL वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

३. विद्यार्थी संख्येनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी.

४. इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत म्हणून ज्या त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

5. इ.१२ वी माहिती तंत्रज्ञान (IT) व सामान्यज्ञान (GK) या विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा क.महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात यावी. क. महाविद्यालयांना संगणक प्रयोगशाळेच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करुन त्याप्रमाणे क. महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी याची माहिती परीक्षेपूर्वी करुन द्यावी. जेणेकरुन कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही.

6. उपरोक्तप्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत वैद्यकीय/अपरिहार्य कारणामुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा, लेखी परीक्षेनंतर **OUT OF TURN** व्दारे निर्धारित कालवधीतच आयोजित करण्यात यावी. यासाठी या तारखेपूर्वी प्रती विषय रुपये 100/- चलनाद्वारे बँकेत भरणे आवश्यक राहिल. या परीक्षांचे गुण ही ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत.

७.प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या माहितीनुसार आपल्या शाळेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. काही अपरिहार्य कारणास्तव एखादा परीक्षक नियोजित वेळेत उपस्थित रहाणार नसल्यास नजीकच्या शाळेतील विषय शिक्षकाची बहिस्थ परीक्षक म्हणून नेमणूक करण्यास हरकत नाही तथापि यासाठी मंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.

८ .फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेपासून प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाचे गुण ऑनलाईन पध्दतीने भरले आहेत. याबाबत प्रत्यक्ष करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सर्वसाधारण सूचनांची अमंलबजावणी गतवर्षी प्रमाणेच करण्यात येत आहे. त्यापध्दतीनेच यावर्षी ऑनलाईन गुण अचूक नोंदविण्यात यावेत.

९. अतिवंलब शुल्काने आवेदनपत्र भरलेल्या व गुणाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये ज्या विद्यार्थ्यांचे अतिरिक्त बैठक क्रमांक उपलब्ध झालेले नाहीत अथवा विषय बदल केला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण खाली नमुद केलेल्या विहीत नमुन्यात स्वंतत्र सिलबंद पाकिटातून देण्यात यावे.

**<u>अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल झालेल्या बैठक क्रमांकासाठी</u>**

**** शाळेच्या लेटर हेडवर स्वतंत्ररित्या गुणतक्ते तयार करावयाचा नमुना**

| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय कोड | बैठक क्रमांक | मिळालेले गुण | |
| | | | | अंकात | अक्षरात |
| १ | | | | | |
| २ | | | | | |

१०. नियमित प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा दिलेले विद्यार्थी यांचे तसेच आऊट ऑफ टर्नने प्रविष्ठ झालेले विद्यार्थी यांचे गुणतक्ते व सर्व साहित्य वितरण केंद्रावर जमा करणेबाबतची तारीख मंडळाच्या संकेतस्थळावरुन यथावकाश कळविण्यात येईल.

११. ऑनलाईन पध्दतीने भरलेले विषयनिहाय सर्व गुणतक्ते मंडळाने पुरविलेल्या एकाच सिलबंद पाकिटामध्ये विषयनिहाय बंच करून देण्यात यावे. श्रेणी लिस्ट पाकिट स्वंतत्ररित्या जमा करावे.

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**